फौजदारी किरकोळ अर्ज नं. ४/२०२६

नि. १ खालील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये सावंतवाडी पोलिस ठाणे गु. र. क्र. १३६/२०२५ मध्ये जप्त असलेले सोन्याचे दागिने यांचा अंतरिम ताबा मिळावा याकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, अर्जदार हिने पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन सावंतवाडी यांचेकडे तिच्या मालकीचे सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र, सुमारे १२ ग्रॅम वजनाचा जुना मुहुर्तमणी, सुमारे १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा बंगाली हार, ५ ग्रॅम वजनाचे कानातले कुडे व झुमके, ४ ग्रॅम वजनाचा कानातील पान चैनीसह जोड हे दागिने तसेच एलआयसी पॉलिसी नं. ९४७९२३६४७ व ९४७९२३८९२ चे बॉड व श्रीराम लाईफ इन्सुरन्स नं. NP०६१५००११९५९३ चोरीला गेल्याबाबत तक्रार दाखल केली होती. सदरची तक्रार गु.र.क्र. १३६/२०२५ अन्वये सावंतवाडी पोलिस स्टेशन येथे नोंद आहे. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर सावंतवाडी पोलिसांना आरोपी निष्पन्न होवून त्यांनी वर नमुद सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. सदरचे दागिने हे अर्जदार हिच्या नेहमीच्या वापरातील आहेत. सदरचे सोन्याचे दागिने अर्जदार यांच्या ताब्यात न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणारे आहे. सबब अर्जदार यांनी सावंतवाडी पोलिस स्टेशन येथील गु. र. क्र. १३६/२०२५ मध्ये जप्त केलेले सोन्याचे दागिने अर्जदार हिच्या ताब्यात देण्यात यावी अशी विनंती अर्जदार हिने केली आहे. सदर दागिने अर्जदार हिच्या ताब्यात देतेवेळी न्यायालयाने अटी व शर्ती घातलेस त्याचे तंतोतंत

पालन करण्याचीही अर्जदारने तयारी दर्शविलेली आहे.

३. अर्जाचे कामी तपासिक अधिकारी तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, अर्जदार यांनी अंदाजे ४१ ग्रॅम वजनाचे ५ प्रकारचे सोन्याचे दागिने चोरीस गेलेबाबत सावंतवाडी पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. आरोपीने वेगवेगळ्या ठिकाणी चोऱ्या केल्या असून काही दागिने गहाण ठेवले आहेत. आरोपीने चोरलेल्या सोन्यापैकी सदर गुन्ह्यामध्ये २०.०० ग्रॅम इतके सोन्याचे ३ तुकडे जप्त करण्यात आले आहेत. सदर २०.०० ग्रॅम इतके सोन्याचे ३ तुकडे हा मुद्देमाल अर्जदारास अटी व शर्तीवर परत करण्यास हरकत नाही.

५. अर्जदाराने प्रथम खबर अहवालाची प्रत व आधारकार्ड इत्यादी कागदपत्र सादर केले आहेत. तसेच अर्जदार हिने दागिने खरेदी केल्याच्या पावत्या अभिलेखावर सादर केल्या आहेत. जप्त मुद्देमालावर इतर कोणीही आपला मालकी हक्क प्रस्थापित केला नाही. तपासिक अधिकारी, सहा. सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्देमाल योग्य अटी व शर्तीवर ताब्यात दाण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे. त्यामुळे अर्जदारास योग्य अटींवर जप्त मुद्देमाल परत करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. निरीक्षक, पोलिस ठाणे, सावंतवाडी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी गु. र. क्र. १३६/२०२५ मध्ये जप्त असलेले

२०.०० ग्रॅम इतके सोन्याचे ३ तुकडे यांचा अंतरिम ताबा अर्जदार हिच्याकडे देण्यात यावा.

३. अर्जदार हिला असे आदेशित करण्यात येते की, तिने रक्कम रुपये ३,००,०००/– (रुपये तीन लाख मात्र) रक्कमेचे क्षतीपूर्ती बंधपत्र द्यावे.

४. अर्जदार हिने केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर सोन्याच्या तुकड्यांच्या स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करावयाचा नाही अगर ते कोणासही विकावयाचे नाहीत.

५. अर्जदार हिने न्यायालय ज्या–ज्या वेळी आदेश करील त्या–त्या वेळी सदर सोन्याचे तुकडे न्यायालयासमोर हजर करावेत.

६. अर्जदार यांनी ओळखीबाबत पुरावा सादर करावा.

७. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.03.17 17:15:20 +0530

दिनांक– १७/०३/२०२६ (जे. एम. मिस्त्री)
सावंतवाडी न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
सावंतवाडी